**म.स.कौ.ह. अर्ज क्र. २८/२०२२.**
**मनिषा वि. नवनाथ**
**नि ३३ लगत.**

**सामनेवालेतर्फे साक्षीदार क्र.१**

साक्षीदाराचे नाव – रघुनाथ भानुदास गाडे,

**साक्षीदाराचा शपथेवर सरतपास गैरअर्जदारातर्फे वकील श्री. एस.बी.सानप यांचे मार्फतः–**

०१. माझ्या सरतपासातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझा अंगठा केलेला आहे.

**साक्षीदाराचा शपथेवर उलटतपास अर्जदारातर्फे वकील श्री. एच.एल.म्हस्के यांचे मार्फतः–**

०२. माझे काहीही शिक्षण झालेले नाही. मला लिहीता वाचता येत नाही. माझे पहिले लग्न कधी झाले हे मला सांगता येणार नाही. दहा ते बारा वर्षापुर्वी माझे दुसरे लग्न झाले. माझ्या पहिल्या पत्नीस मुल बाळ होत नसल्यामुळे मी दुसरे लग्न केले. मला पहिल्या पत्नीपासुन मुल बाळ न होण्याचे कारण मी सांगु शकत नाही. मुल बाळ व्हावे म्हणुन मी दवाखाने केले नाही. मी त्याबाबत माझी वैद्यकिय तपासणी करुण घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझी वैद्यकिय तपासणी न करता मल व्हावे या करीता दुसरे लग्न केले. हे म्हणणे खरे आहे की, मी दुसरे लग्न अर्जदार हिच्या घरी केले होते. मुला बाळा करीता मी दुसरे लग्न करत आहे अशी कल्पना मी अर्जदारास दिली होती. अर्जदाराचे पहिले लग्न झाले होते हे मला माहित आहे. अर्जदारासोबत लग्न झाल्यानंतर मी दहा ते बारा दिवस तिच्या सोबत राहीलो. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही माझ्या सोबत नादंत असतांना मी तिला मारहाण करुन हाकलुन दिले. हे म्हणणे खरे नाही की, पहिल्या पत्नीस मुल बाळ झाले नाही व तुलाही मुल बाळ होत नाही असे मी अर्जदारास म्हणत असे. हे म्हणणे खरे नाही की, त्या कारणावरुन मी अर्जदारास त्रास देवुन माहेरी हाकलुन देत असे. हे म्हणणे खरे नाही की, तरी देखील अर्जदार माझ्याकडे नांदण्यासाठी येत होती.

प्रश्न – अर्जदार ही तुमच्या सोबत ११ वर्ष नांदली ?

उत्तर – ती येवुन जावुन करत होती.

०३. हे म्हणणे खरे नाही की, मी व सामनेवाली क्र.२ हे अर्जदारास विनाकारण त्रास देत होते. मी ११ वर्षामध्ये अर्जदारास दोन ते तीन वेळा नांदण्याकरीता घेवुन येण्यासाठी तिच्या माहेरी गेलो होतो.

प्रश्न – मी अर्जदाराच्या माहेरी तिला घेवुन जाण्यासाठी गेल्यानंतर ती तुमच्या सोबत येत होती ?

उत्तर – एक वेळा आली होती.

०४. माझ्या नावे सव्वा दोन एकर जमीन आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, त्यामध्ये माझ्या पाच बहिणीचा हिस्सा देखील आहे. त्या जमीनीचा गट क्र.२४४ असा आहे. त्या जमीनीचे क्षेत्रफळ ७७ गुंठे आहे. गट क्र.२४६ ही दुसरी जमीन आहे. त्या जमीनीचे क्षेत्रफळ ६० गुंठे आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरील दोन्ही जमीन माझ्या नावे आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या दोन्ही जमीनीची मी वहिवाट करतो. माझ्या शपथपत्रात नमुद ''मी सन २०२२ मध्ये अर्जदारास घेवुन येण्यासाठी तिच्या माहेरी गेलो होतो'' हा लिहीलेला मजकुर बरोबर आहे. त्यावेळी माझ्या सोबत माझे मेव्हणे व एक पाव्हणा होता. त्या पाव्हण्याचे नाव दादासाहेब काळे असे आहे. मी अर्जदारास घेवुन येण्यासाठी तिच्या माहेरी गेलो त्यावेळी परत तिला आणुन घालतो असे मला सांगण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, मी व सामनेवाले क्र.२ अर्जदारास त्रास देवनु तिला घरी हाकलुन देत होतो. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाले क्र.२ च्या भावाने घर बांधुन दिले आहे असे म्हणुन सामनेवाले क्र.२ अर्जदारास घरात राहु नको असे म्हणत होती.

प्रश्न – तुम्ही अर्जदारास गु–याच्या गोठ्यात ठेवत असत ?

उत्तर – त्यावेळी आम्ही सर्व गु–याच्या गोठ्यात राहत होतो.

०५. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वतः घर बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदारास कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही सर्वस्व माझ्यावर अवलंबुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराचा संभाळ करण्याची माझी जबाबदारी आहे.

प्रश्न – अर्जदार तुमच्या बरोबर येण्यासाठी तयार आहे ?

उत्तर – मला माहित नाही.

०६. मी अर्जदारास नांदवण्यास तयार आहे.

**(अर्जदार व गैरअर्जदार यांनी एकत्र नांदण्याची प्राथमीक तयारी दर्शविलेली आहे. सबब पुढील उलटतपास तहकुब.)**

उलटतपास पुर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृति

KULKARNI DATTATRAYA RAMESH

Digitally signed by KULKARNI DATTATRAYA RAMESH
Date: 2026.03.09 18:08:56 +0530

दिनांक- ०९.०३.२०२६

(डी.आर.कुलकर्णी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी
कोर्ट नं. ३ शेवगाव.